# नूतन बालशिक्षण संघाचा वैचारिक इतिहास

नूतन बालशिक्षण संस्थेची स्थापना, ही घटना भारतीय शिक्षणाच्या इतिहासात एक भाग्याची गोष्ट आहे.इतिहासात नेहमीच असे घडते की, एखाद्या विचारी व्यक्तिच्या मनात, आजूबाजूच्या परिस्थितीच्या अवलोकनाने, वाचनाकरवी ज्ञानसागरात अवगाहन केल्याने अथवा स्फूर्तीच्या प्रभावी क्षणाला कल्पकतेने झेप घेतल्याने एखाद्या विचाराचे बीज रूजते आणि मग त्यातून, अवघ्या मानवी जीवनालाच वेगळे वळण लागून मानवी संस्कृतीचे पाऊल पुढे पडते. हे जसे विज्ञान संशोधनाच्या क्षेत्रात घडते अथवा अध्यात्माच्या दुर्गम प्रदेशात घडते तसेच ते दैनंदिन सामाजिक जीवनातही घडून येते. जागतिक पातळीवर, गेल्या शतकाच्या प्रारंभी मादाम मरिया माँटेसरींच्या शिक्षणविषयक विचारांनी अशीच खळबळ उडवून दिली त्याच्याच वाऱ्याने भारतात, सौराष्ट्रामधील गिरीजाशंकर बधेका यांच्या विचारी मनाची शिडे उघडली ; आणि त्यांनी काही व्यक्तिगत निर्णय घेतले. आपल्या वकिली व्यवसायाशी फारकत घेऊन, 'बालकांची, त्यांच्या स्वातंत्र्याची नि त्यांच्या शिक्षणाची वकिली करण्याचा वसा घेतला. ‘नूतन बालशिक्षण संघा’च्या जन्माचा उगम हा असा आहे.

नूतन बालशिक्षण संघाच्या स्थापनेमागची आणि दीर्घकालाच्या कार्याची प्रेरणा ही मादाम माँटेसरींच्या शैक्षणिक विचारांतून आलेली आहे. या संघाची स्थापना ज्या थोर व्यक्तींनी केली त्या गिजुभाई बधेका, सरलाबाई साराभाई व ताराबाई मोडक या सर्वांनीच माँटेसरींच्या १९१२ साली इंग्रजीतून प्रसिध्द झालेल्या ग्रंथांच्या वाचनाने, त्यांचे विचार आत्मसात केले; त्या विचारांच्या आधाराने प्रत्यक्ष प्रयोग केले, व या प्रयोगांतून भारतीय बालशिक्षणाच्या आचार -विचारांचा हिमालय उभा गेला. त्यामुळे, एका अर्थाने नूतन बालशिक्षण संघाचा वैचारिक पाया तर दुसऱ्या अर्थाने तर भारतीय बालशिक्षणाचा वैचारिक आधार असलेला माँटेसरीबाईंचा शिक्षणविषयक विचार हीच आपल्याला 'संघा'च्या इतिहासात सुरुवात मानता येईल. डॉ. मरिया माँटेसोरी- इटली देशातील रोम शहरात, तेथील एका झोपडपट्टीतील चाळीत एका मोठया खोलीत, जानेवारी १९०७ मध्ये डॉ. मारिया माँटेसोरी यांनी आपले 'बालघर' सुरू केले. वास्तविक, या चाळींतील मुलांकडून होणारी नासधूस, उनाडक्या कमी व्हाव्यात व त्यांना काही वेळ तरी शाळेत जखडून ठेवावे, या उद्देशाने, शाळेच्या मालकाने शाळा सुरू केली होती, व त्यावर डॉ. माँटेसोरींची नेमणूक केली होती.

परंतु, एक आव्हान म्हणून हे काम स्वीकारणाऱ्या मॉन्टेसोरीबाईंची दृष्टी वेगळी होती. हे काम स्वीकारण्यापूर्वी त्यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केली होती. अपंग, मंदबुद्धी, मंदगती मुलांच्या प्रश्नांवरील कामाचा अनुभव प्राप्त केला होता. बालकांचे निरीक्षण करण्याची इटार्डची पध्दत अंगवळणी पाडून घेतली होती. रूसो, पेस्टालॉझी, फ्रोबेल यांच्या शैक्षणिक विचारांची व प्रयोगांची माहिती करून घेतली होती. जीन इटार्डच्या अवेरॉनमधील रानटी मुलाला शिकविण्याच्या प्रयोगाचा अभ्यास केला होता आणि फ्रेंच डॉक्टर एडवर्ड सेग्वीनच्या, मंदबुध्दी मुलांसाठीच्या शैक्षणिक पध्दती व साधने आपलीशी केली होती. एवढेच नव्हे तर, तत्कालीन इटालीमधील पठडीबध्द, बंदिस्त, मुलांना तासंतास बाकांवर जखडून ठेवणाऱ्या प्राथमिक शाळांची दयनीय स्थितीही न्याहाळली होती. आणि मानववंशशास्त्रावर अध्यापनशास्त्राच्या दृष्टिकोणातून रोम

विद्यापीठात भाषणेही दिली होती. या साऱ्या संचितातून त्यांना कळले होते ते असे की, कोणत्याही त-हेच्या शारीरिक, मानसिक अथवा सामाजिक - सांस्कृतिक प्रश्न असलेल्या मुलांना सेग्विनने सांगितल्याप्रमाणे गरज आहे ती 'आरोग्यापचारां'ची नव्हे तर 'शिक्षणोपचारां'ची! बालकांच्या शिक्षणाच्या बाबतीत जाणवलेले हे तत्त्व व्यवहारात तावून सुलाखून पाहण्याची एक संधीच, मॉंटेसोरीबाईंना, या निमित्ताने लाभली.

या बालघरात, तीन ते सात या वयोगटातील साठ मुले जमा झाली होती. या वयाच्या बालकांवर काही शैक्षणिक संस्कार करणे हे एक जबरदस्त आव्हान होते. कारण, 'ही छोटया घरांतील, झोपडयांमधील साठ मुले. त्यांना कोणी त्राता नाही, वाली नाही. त्यांच्या चेहऱ्यावर भाव तर कसलेच दिसत नव्हते. भयभीत झालेले डोळे, कारण आयुष्यात त्यांनी काहीच पाहिले नव्हते. डोळयात अश्रू, चेहयावर भीती आणि त्यामुळेच ती मुले मूक होती. त्यांना बोलके करणे जवळजवळ अशक्य होते." परंतु मॉन्टेसोरी या चिंतनशील व प्रयोगशील शिक्षिका होत्या. त्यामुळे मुलांमध्ये अल्पावधीतच लक्षणीय बदल त्या घडवू शकल्या. इतकेच नव्हे तर त्यांनी, येथील आपल्या अनुभवांचे सामान्यीकरण करून त्यावरचा 'सायंटिफिक पेडॅगॉजी ॲज अप्लाईड टू चाईल्ड एज्युकेशन इन दि चिल्ड्रेन्स हाऊसेस ' हा आपला ग्रंथही १९०९ मध्ये प्रसिध्द केला. त्याचवर्षी आपल्या शिक्षणपध्दतीवरील पहिला प्रशिक्षण वर्गही त्यांनी घेतला. केवळ चार - पाच वर्षांच्या अवधीतच या शाळेची कीर्ती, देशाच्या सीमा ओलांडून, युरोप- अमेरिकेत पसरली. इटली व स्वित्झर्लंडमध्ये या धर्तीवर अनेक शाळा चालू लागल्या. १९११ साली अमेरिकेत पहिले मॉंटेसोरी स्कूल निघाले. तत्कालीन विद्वानांच्यात मॉन्टेसोरींचे प्रयोग व शिक्षणपध्दती यांची चर्चा होऊ लागली. अनेक थोरा - मोठयांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन, प्रयोग जवळून पाहिला. १९१३ सालच्या त्यांच्या लंडन येथे आयोजित केलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण वर्गाचा लाभ वेगवेगळया देशांतील लोकांनी घेतला. अनेकांना या प्रयोगात संपूर्ण शैक्षणिक परिवर्तनाचीच बीजे आढळून आली.

युरोपपेक्षाही अमेरिकेत मॉन्टेसोरींच्या विचारांचा झंझावात अधिक वेगाने पसरला. १९११ ते १९१५ या केवळ पाच वर्षात मॉन्टेसोरींवर दोनशेपेक्षाही अधिक प्रकाशने निघाली. भारतातही, १९१२ च्या सुमारास प्रसिध्द झालेल्या मॉन्टेसोरींच्या पुस्तकांच्या इंग्रजी भाषांतरावरील परीक्षणे, येथील इंग्रजी वृत्तपत्रांतून प्रसिध्द झाली, व त्यांनी काही शिक्षणप्रेमींना या पुस्तकांकडे वळविले. अमीन, गिजुभाई बधेका , सरलादेवी साराभाई, अशी काही मंडळी मॉन्टेसोरींच्या नवशिक्षणामुळे बालशिक्षणाकडे ओढली गेली.

पुढे काही काळ हा भर ओसरला. कारण युरोपमध्ये शिक्षणाच्या नि बालशिक्षणाच्या क्षेत्रांत अनेक नवे संप्रदाय निर्माण झाले. फ्रोबेलच्या 'बालोद्यान' पध्दतीचा आग्रह धरणाऱ्या शाळा मॉंटेसरीच्या पूर्वीपासून तुरळकपणे का होईना, युरोपमध्ये अस्तित्वात होत्या. जर्मनीत तर त्याचा आढळ मोठया प्रमाणात होता. इंग्लंडमध्ये 'नर्सरी स्कूल' च्या पर्याय मॉंटेसरी पध्दतीला निर्माण झाला होता. परंतु इंग्लंड अमेरिकेत केवळ नवे संप्रदाय अस्तित्वात आले असेच नाही तर मॉंटेसरींच्या विचारांची चिकित्सा मोठया प्रमाणावर होऊ लागली. जॉन ड्युई सारख्या मान्यताप्राप्त शिक्षणतज्ञाने तर मॉंटेसरीच्या शिक्षणपध्दतीवर ताशेरे ओढले होते. तशातच पुढे , दुसऱ्या महायुध्दाच्या काळात, विशेषतः जर्मनीतून मॉंटेसरी शिक्षणपध्दतीची हकालपट्टीच झाली. याची कारणे अर्थातच शैक्षणिक नव्हती तर ती राजकीय होती. अशाच राजकीय कारणांनी, मॉंटेसरीपध्दतीच्या खुद्द

जन्मस्थानी, म्हणजे इटलीमध्ये मुसोलिनीच्या कारकिर्दीत, तिचे अवमूल्यन करण्यात आले. साम्यवादी रशियाला तर माँटेसरीचा बालकांच्या स्वातंत्र्याचा सिध्दांत पटणाराही नव्हता आणि राजकीयदृष्टया परवडणाराही नव्हता. अलीकडे मात्र १९६० नंतर पुन्हा एकदा मॉन्टेसोरींचे विचार अमेरिकेतील लोक आपलेसे करू लागले आहेत. अमेरिकेच्या पाठोपाठ सर्व युरोपमध्ये आणि जगातील इतरही भागांतून मॉन्टेसोरींच्या प्रयोगांचा नि त्यावरील लेखनाचा बोलबाला पुन्हा एकदा होऊ लागला.

**माँटेसोरींचे बालकाविषयीचे विचार**

माँटेसोरीबाईंचे पहिले पुस्तक १९०९ सालचे. यानंतरही त्यांची अनेक पुस्तके एकापाठोपाठ प्रसिध्द झाली. उदाहरणार्थ, द सिक्रेट ऑ फ चाईल्डहूड, द अबसॉरबंट माईंड, एज्युकेशन फॉर अ न्यू वर्ल्ड, एज्युकेटिंग द हयुमन पोटेंशियल आणि सायको -अरिथमॅटिक, सायकोजिऑमेट्री इत्यादी. त्यांमधून त्यांनी केवळ आपले प्रयोग, त्यांचे निष्कर्ष, किंवा आपले अनुभवच मांडले नाहीत तर त्यांतून शिक्षणविषयक, बालशिक्षणविषयक नवे विचार मांडले. या विचारांना मानसशास्त्रीय आधार पुरविला आणि नवे सिध्दांतनही केले. या सर्व ग्रंथांचा केंद्रबिंदू 'मूल' हाच आहे. सहा -सात वर्षांपर्यंतचे बालक समजावून घेण्याचा नि समजावून देण्याचा प्रयत्न या ग्रंथांतून केलेला आहे. तसेच बालकाची प्रज्ञा, जिज्ञासा, स्वयंशिक्षणाची उपजत क्षमता, त्यासाठी मुलाला हवे असणारे पूर्ण स्वातंत्र्य, त्यासाठी जाणीवपूर्वक करावयाची वातावरणनिर्मिती आणि इतर कुठल्याही वयात नाही इतके या वयात, शिक्षकाने बालकाच्या विकासास सहाय्यभूत होण्याची गरज, हा सर्व या ग्रंथांमधील विचारांचा गाभा आहे.

डॉ. मॉन्टेसोरी या बालकांविषयी आणि बालकांच्या शिक्षणाविषयी, तत्कालीन जगताला पूर्णतः नवीन असणारे विचार जरी मांडत होत्या, तरीही त्या फक्त बालकांविषयी बोलत नव्हत्या. त्याच्या केवळ बालवयातील शिक्षणाविषयी बोलत नव्हत्या, की शैक्षणिक साधने नि पध्दतींविषयी बोलत नव्हत्या. त्या सदैव बोलत होत्या ते मानवी जीवनाबद्दल, मातेच्या उदरात, असल्यापासून विकसित होत जाणाऱ्या 'चैतन्या' बद्दल. म्हणूनच त्या म्हणतात, "बालकाचे कार्य असते ते आपल्यातून, आजूबाजूच्या वातावरणाला, काळाला, स्थानाला नि संस्कृतीला साजेसा असा पूर्ण मनुष्य घडविण्याच्या कार्याला योग्य वेळी, योग्य पध्दतीने हातभार लावणे म्हणजे बालकाचे शिक्षण, अशी त्यांची शिक्षणविषयीची धारणा होती.

या आपल्या 'ॲबसॉरबंट माईंड' या ग्रंथात डॉ. मॉन्टेसोरी म्हणतात, "बालकाजवळ स्वतःचे स्वतःच आकलन करून घेणारे मन असते, याचा जेव्हा सुगावा लागला तेव्हा शिक्षणात क्रांती घडून आली. आता आपल्याला हे सहजपणे समजू शकते की, ज्या वयात बालकाचे व्यक्तिमत्व आकार घेत असते असा सुरुवातीचा काळ, सगळयात जास्त महत्त्वाचा का असतो. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही वयात, बालकाला, इतक्या जाणीवपूर्वक सहाय्याची गरज नसते. आणि आपण त्याला सहाय्य करायचे असते ते, हा एक निःशक्त, दुबळा जीव आहे म्हणून नव्हे, तर उपजतच त्याला विलक्षण अशी निर्मितीक्षमता लाभली आहे म्हणून.

जेव्हा आपल्याला हे कळून येईल की अगदी लहान वयातील बालकाला आपल्यापेक्षा वेगळे मन प्राप्त झाले आहे, आपण केवळ तोंडीसूचना देऊन त्या मनापर्यंत पोचू शकणार नाहीत किंवा अजाणतेपणापासून जाणतेपणाकडे प्रवास करणाऱ्या त्या मनापर्यंत आपण प्रत्यक्षपणे पोचू शकणार नाही, तेव्हा साहजिकच शिक्षणाविषयीची संपूर्ण संकल्पनाच बदलून जाते ..." आपल्या सायंटिफिक पेडॅगॉजी' या ग्रंथात मादाम मॉन्टेसोरींनी म्हणून ठेवले आहे की, " बालकाच्या, अगदी लहान वयातील शिकण्याचा हेतू, त्याची शाळेसाठी तयार करून घ्यायचा असा नसून त्याला त्याच्या जीवनभरासाठी तयार करणे हा आहे. " ही जीवनभराची तयारी होण्यासाठी, अर्थातच, बालकाला, कोणत्याही मनुष्याला असावा असा, स्वतंत्रतेचा हक्क असायला हवा, असेच डॉ. मॉन्टेसोरींचे प्रतिपादन आहे.

मॉन्टेसोरींचा १९०९ साली प्रसिध्द झालेला, 'सायंटिफिक पेडॅगॉजी...' हा ग्रंथ तत्कालीन पारंपरिक शिक्षणाला व तत्संबंधीच्या पारंपरिक विचारांना धक्का देणारा असा होता. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर 'द मॉन्टेसोरीं मेथड' या नावाने १९१२ साली प्रसिद्ध झाले. मॉन्टेसोरींनी आपल्या नवीन शैक्षणिक तंत्रांच्या व साधनांच या मागे असलेल्या भूमिकेची सैद्धांतिक मांडणी, या ग्रंथात केली. आपल्या स्वतःच्याच अनुभवांतून आणि प्रयत्नांतून शिकण्यासाठी बालकाला स्वातंत्र्य असायला हवे, आणि असे बालकाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे व त्याला काही विशिष्ट दिशेने 'कार्य' पुरवणे ही प्रौढांची जबाबदारी आहे, असे त्यांचे तार्किक विवेचन आहे. स्वतःच्या हालचालींतून, शैक्षणिक साधनांच्या सहाय्याने नि आपल्या पंचेद्रियांच्याकरवी, बालक, विशिष्ट शिस्तीने आपल्या तार्किक विचाराची बैठक पक्की करीत असते, नि मग हाच, बालकाच्या पुढील औपचारिक शिक्षणाचा पाया ठरतो. हे तात्त्विक विवेचन, शिक्षणाच्या क्षेत्रात खळबळ उडवून देणारे असेच होते.

'द मॉन्टेसोरी मेथड' या पुस्तकाची एक नवी आवृत्ती १९६४ साली अमेरिकेत प्रसिद्ध झाली. त्यावेळी इलिनॉईस विद्यापीठात असलेले मानसशास्त्राचे प्राध्यापक जे. मॅकवी हंट यांची, एक सविस्तर अशी प्रस्तावना या ग्रंथाला आहे. त्यात, मॉन्टेसोरींच्या या ग्रंथाचा अर्धशतक ओलांडल्यानंतरही नेमके काय महत्त्व आहे, आणि मध्यंतरीच्या काळातील मानसशास्त्राच्या व अन्य शास्त्रांतील संशोधनाच्याविकासा नंतरही, या ग्रंथाकडे का वळायला हवे, याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते, एक असे की, मॉटेसोरीबाईंनी विकसित केलेल्या शैक्षणिक साधनांवर खेळत असताना, बालकाचे अवलोकन करणे, व त्यावरून बालकाच्या मानसिक विकासासाठी शैक्षणिक परिस्थितीत कशा प्रकारचा बदल करायला हवा, याचा शोध घेणे, या गोष्टीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मॉन्टेसोरीबाईंचा तो एक मूलभूत स्वरूपाचा शोध आहे.

दुसरे असे की, आजच्या शैक्षणिक परिस्थितीतील प्रश्नांना भिडणारी बालशिक्षणाची एक पध्दतीच त्यातून विकसित झाली आहे. एकदम पहिलीत औपचारिक शिक्षणाला सुरुवात होण्यापूर्वी, त्यांच्या शैक्षणिक पूर्वतयारीच्या क्षमता विकासाच्या संधी, बालकाला अशा बालशाळेपासून उपलब्ध होतात. विशेषतः मागास समाजातील मुलांना अशा संधी मिळण्याचे महत्त्व अनिवार्य आहे. आपल्या देशातील ग्रामीण भागातील बहुसंख्य मुलांच्या बाबतीत, मॉन्टेसोरींचे बालशिक्षण विषयक विचार व शैक्षणिक साधने यांचा उपयोग, या

साधनांच्या काही अंगभूत मर्यादा विचारांत घेऊनही त्यांना इतर प्रगत मुलांच्या बरोबरीत आणण्यास उपयुक्त ठरणारा आहे. आजही मॉन्टेसोरी पद्धती कालसुसंगत अशी आहे.

जे. मॅकवी हंट यांनी मॉन्टसोरींचे हे महत्त्व सांगूनही सुमारे चाळीस वर्षे उलटली आहेत. हाच मूलभूत विचार घेऊन जगात बालशिक्षणाच्या बाबतीत शास्त्रीय दृष्टीकोणातून खूपच कार्य झाले आहे. आपल्या देशातही शास्त्रीय बालशिक्षणाचे नमुने विकसित झाले आहेत. याच वर्षी ज्याला पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत, त्या नूतन बाल शिक्षणसंघाने (मूळचे नाव मॉन्टेसोरी संघ) या बाबतीत प्रयोग आणि प्रसार यांच्या सहाय्याने बालशिक्षणाला भारतीय शैक्षणिक व्यवहारात मध्यवर्ती स्थान प्राप्त करून दिले आहे.

नूतन बाल शिक्षण संघाची म्हणजे तत्कालीन माँटेसोरी संघांची अभ्यासक मंडळी माँटेसोरीच्या कोणत्या विचारांनी आणि का व कशी प्रभावीत झाली, याचा शोध घेता येणे शक्य आहे.

**पारंपरिक शिक्षण**

माँटेसोरींच्या विचार दृढीकरणामागे त्यांचे, मंदबुध्दी बालकांच्यात तसेच झोपडपट्टीतील मागास मुलांच्यात केलेले प्रत्यक्ष व प्रयोग होते. हे प्रयोग जसे त्या त्या परिस्थितीत, त्या त्या बालकवर्गाच्या गरजांतून निर्माण झाले होते. तसेच ते, एकूणच तत्त्कालीन इटलीमधील पठडीबद्ध, बंदिस्त वातावरणांतील प्राथमिक शिक्षणाच्या असमाधानांतून निर्माण झाले होते. पुढे मानसशास्त्र, उत्क्रांतिशास्त्र, जीवशास्त्र यांचा अभ्यास व प्रत्यक्ष शाळेतील बालकांचे केलेले अवलोकन यांमधून, माँटेसरीबाईंच्या लक्षात आलेली गोष्ट अशी की, पूर्वापार चालत आलेल्या पठडीबद्ध शिक्षणाच्या मागे मुलांकडे पाहण्याची एक परंपरागत दृष्टी आहे. मुलांना शिकण्यासाठी समोर बसवताना, मुलांबाबत एक विशिष्ट भूमिका आहे. बालकांना काही कळत नाही, त्यांना आपणहून काही करता येत नाही, त्यांना कुणीतरी सांगितल्याशिवाय काही येत नाही, ही ती बालकांबाबतची दृष्टी होती. ही सार्वत्रिक दृष्टी होती. मूल म्हणजे मातीचा गोळा आहे आणि त्याला कुणीतरी काही आकार द्यायचा आहे. बालक हे मूलतः अडाणी आहे, त्याला ठोकून ठाकून शिकवून तयार करायचे आहे. अशी भूमिका घेऊनच परंपरागत शाळा निर्माण झालेल्या होत्या. या शाळांमधून साहजिकच बालकांना घडविण्याचे त्यांना शिकविण्याचे कार्य करावयाचे असते आणि त्यासाठी बालकांना घडविणारा नि शिकविणारा शिक्षक असावा लागतो, या गोष्टीला सार्वत्रिक मान्यता मिळालेली होती. या मान्यतेमधून शाळांचे स्वरूपही निश्चित झालेले होते. हे होते 'शिक्षककेंद्री' अशा शाळांचे. आणि 'शिकवतो तो शिक्षक अशीच 'शिक्षका' ची व्याख्या जनमानसात स्थिर झालेली होती.

माँटेसोरीबाईंचे अत्यंत महत्त्वाचे शैक्षणिक कार्य कोणते असेल तर त्यांनी बालकांबाबत,बालकांच्या शिक्षणाबाबत व बालकांना शिकवणाऱ्या शिक्षकाबाबत अत्यंत क्रांतिकारक असे नवीन विचार मांडले. विचारांनी, विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जगात खळबळ माजविली. याचे एक कारण असे, की हे नवक्रांतिकारक विचार एका नव्या शिक्षणपद्धतीला जन्माला घालत होते. पण दुसरे कारण असे, की या विचारांमुळे तत्कालीन प्रचलित, परंपरागत शिक्षणपद्धतीच्या पायालाच हादरा दिला होता. बालकांबाबतीची नवी दृष्टी समाजाला देण्याच्या प्रयत्नात जुनी दृष्टी कशी बालविकासास घातक आहे हे सांगितले जात होते. बालकांबाबत नवी भूमिका मांडत असताना, याबाबतची आपली जुनी भूमिका कशी अडाणीपणाची आहे हे

दर्शविले जात होते. आणि नवा शिक्षक कसा असावा हे सांगत असताना, तो जुन्या शिक्षकासारखा असू नये हे ठासून मांडले जात होते. त्यामुळे, जुने पठडीबद्ध, परीक्षाभिमुख, शिक्षा-प्रलोभनांवर भिस्त ठेवणारे शिक्षण, शिक्षकालाच सर्वस्वी मध्यवर्ती स्थान देणारे शिक्षण, बालकांवर पदोपदी अन्याय करणारे शिक्षण, सर्व बालकांना एकाच माळेचे मणी ठरवून, वर्गपद्धतीने दिले जाणारे सर्वांसाठी एकच असे शिक्षण, थोडक्यात, 'शिकवणारे शिक्षण आणि बालकांबाबतच्या नव्या दृष्टीने नव्या भूमिकेने, शिक्षकाबाबतच्या नव्या अपेक्षेने बालकास 'शिकण्याची' संधी देणारे बालकेंद्री शिक्षण यांमध्ये एक मोठा संघर्ष उभा करण्याचे थोर कार्य माँटेसोरीबाईंनी केले आणि जगभरातच शिक्षणाविषयी आचार व विचारात गुंतलेल्यांना त्याचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाले.

या परंपरागत पठडीबद्ध शिक्षणाचा विचार केला तर, माँटेसोरींच्या इटलीमधील आणि भारतामधील तत्कालीन शिक्षणपद्धतीत काहीच फरक नव्हता. स्वतः गिजुभाईंच्या स्वतःच्या शिक्षणाबाबतच्या आठवणी अत्यंत कटू होत्या ते जेव्हा आपल्या स्वतःच्या मुलाच्या शिक्षणाचा विचार करीत होते, तेव्हा एका पिढीनंतरही काहीही फरक न पडलेल्या या सार्वत्रिक पठडीबद्ध शिक्षणाचा फोलपणा त्यांना जाणवलेला होता. वकिली सोडून शिक्षणाकडे वळण्याच्या वैयक्तिक निर्णयामागची कारणे पाहिली तर असे लक्षात येते की, येथल्या प्राथमिक शिक्षणाविषयी काहीतरी असमाधान तर होतेच. परंतु माँटेसोरींच्या विचारांच्या स्पर्शाने या असमाधानाचा नेम का अर्थ गिजुभाईंना सापडला. माँटेसोरींनी दिलेल्या 'नव्या दृष्टी'तून इथल्या शिक्षणाकडे पाहताना त्यातील व्यवहारांमागच्या दृष्टीतील कोतेपणा त्यांना जाणवला. आणि तेथील शिक्षणात अमूलाग्र बदल घडवून आणण्याची ऊर्मी त्यांच्यात जागृत झाली.

**नवीन शिक्षण**

माँटेसोरींनी माँटेसोरीं मेथड ( मूळ नावः 'सायंटिफीक पेडॅगॉजी, अॅन् अॅप्लाईड टू चाईल्ड एज्युकेशन इन द चिल्ड्रेन्स हाऊसेस' ) या आपल्या पहिल्या ग्रंथात, सुरुवातीलाच संपूर्ण नवीन शिक्षणपद्धती निर्माण करण्याच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्या लिहितात, "आपण जर शास्त्रीय शिक्षणपद्धतीचा विचार करणार असू तर मग, आपल्याला आजवर ज्या पद्धतींचा वापर झाला त्यापेक्षा वेगळया दिशेने जावे लागेल. शाळेमध्ये करावयाचा बदल आणि त्यासाठी करावयाची शिक्षकांची तयारी या दोन्ही गोष्टी एकदमच करायला हव्यात. कारण, जर आपण शिक्षिकेचे रूपांतर निरीक्षकात करणार असू तिला प्रायोगिक पद्धतींची ओळख करून देणार असू, तर मग शाळेत अवलोकन करणे व प्रयोग करणे तिला शक्य झाले पाहिजे. शास्त्रीय अध्यापनशास्त्राचे प्रमुख तत्त्व अर्थातच, बालकाचे स्वातंत्र्य हेच आहे. कारण असे स्वातंत्र्यच व्यक्तीच्या विकासाला वाव देते; बालकाच्या उत्स्फूर्त अभिव्यक्तीला वाट देते. जर का बालकाच्या अवलोकनामधून शास्त्रीय शिक्षण जन्माला येणार असेल तर मग असे अवलोकन केवळ मुक्त बालकांचेच असावे लागेल. अध्यापनशास्त्र मानववंशशास्त्र व प्रायोगिक मानसशास्त्र यांतून निघणारी बदलती पद्धती आजच्या पठडीबद्ध परीक्षाभिमुख शिक्षणातून प्राप्त होईल म्हणून वाट पाहणे निरर्थक होय.

याचा अर्थ असा की, आपल्या पठडीबद्ध अशा पारंपरिक शिक्षणपद्धतीतून नवीन शिक्षणपद्धती जन्माला येणार नाही. त्यामुळे केवळ चालू असलेल्या शिक्षणपद्धतीत थातुर- मातुर बदल करून जर कोणी

शिक्षणपद्धतीत सुधारणा करू पाहत असतील तर ते त्यांचे प्रयत्न निरर्थकच ठरणार आहेत. दुसरे असे की, मॉंटेसोरींच्या मते, आपण नवी शास्त्रीय शिक्षणपद्धतीचा अवलंब करणार असू तर शाळा व शिक्षक अशा दोन्ही घटकांमध्ये एकदमच परस्परपूरक असे बदल करायला हवे आहेत. तिसरे असे की, प्रत्यक्ष बालकांच्या दैनंदिन उत्स्फूर्तपणे वागणुकीचे नेटकेपणाने अवलोकन करूनच बालकाच्या मानसापर्यंत पोचले पाहिजे. इथे बालमानसशी संबंधित अशा विविध शास्त्रांमधील आधुनिक संशोधनांचा उपयोग होऊ शकेल. चवथे म्हणजे, असे व्यक्तिगत पातळीवर बालकाचे अवलोकन करायचे असेल तर, ज्याचे अवलोकन (व नंतर त्यावर आधारित असे शिक्षण) करायचे ते बालक पूर्णपणे मुक्ततेच्या, स्वातंत्र्याच्या वातावरणात असले पाहिजे .

**मॉंटेसोरीची विचारधारा**

मॉंटेसोरींनी ज्या तत्त्वांचा बालशिक्षणाच्या क्षेत्रात आग्रह धरला त्या तत्त्वांचे स्वरूप समजावून घेतले तर नूतन बालशिक्षणसंघाच्या पहिल्या पावशतकातील वाटचालीवर अधिक प्रकाश पडू शकेल. अर्थात ही तत्त्वे तुटकपणे समजावून न घेता, मॉंटेसोरींची एकूण विचारधारा लक्षात घ्यायला हवी. त्यामध्ये, त्यांच्या म्हणून मांडल्या जाणाऱ्या, स्वयंस्फूर्ती, स्वावलंबन, स्वातंत्र्य, शैक्षणिक वातावरण, शैक्षणिक साधने - इंद्रिय शिक्षणाची साधने, शिक्षकाचे कार्य इत्यादी संकल्पनांचे स्थान व या सर्व संकल्पनांचा परस्परसंबंध यांची मांडणी केली, तर मॉंटेसरी विचारांचा एक व्यापक आलोक नजरेसमोर येऊ शकेल.

मॉंटेसरींच्या शैक्षणिक विचारांच्या आलोकामागे रूसोसारख्या निसर्गवादी तत्तज्ञान्यांचे, पेस्टॉलॉझी, फ्रोबेल इटार्ड, यांच्यासारख्या प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञांचे आणि मानववंशशास्त्र, जीवशास्त्र , वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र , उत्क्रांतिशास्त्र, आरोग्यशास्त्र अशा विविध शास्त्रांचे, आधार आहेत. अर्थात या सगळयांपेक्षाही, मॉंटेसोरी मानसशास्त्राच्या क्षेत्रात प्रामुख्याने अवगाहन करतात; आणि त्याकरवी बालमानसशास्त्रात, योग्य शिक्षणपद्धतीच्या शोधासाठी, उतरतात. मूल कसे वाढते, मानसिकदृष्टया कसे घडते आणि या वाढण्या घडण्याच्या काळात घडणाऱ्या प्रक्रियांची प्रत्यक्ष अभिव्यक्ती बालकांच्या दैनंदिन वागणुकीतून कशाप्रकारे होते, हा मॉंटेसोरीच्या चिंतनाचा विषय झाला होता. बालकाचे - प्रत्येक बालकाचे मानस समजल्याशिवाय त्याच्या शिक्षणाची तयारी करता येणे कठीण आहे अशी मॉंटेसोरींची भावना आहे. बालमानस समजावून घेण्याची एक शास्त्रशुद्ध पद्धत त्या, आपल्यापुढे ठेवतात. एक आहे, संशोधनाच्या क्षेत्रात मान्य असलेली, निरीक्षण किंवा अवलोकनपद्धत. बालकाच्या मानसाचीच अभिव्यक्ती त्याच्या वागण्याच्या पद्धतीत होत असल्यामुळे, बालकाच्या वागणुकीचे सूक्ष्म निरीक्षण करून या निरीक्षणांच्या आधारे बालकाच्या मानसाविषयीचे निष्कर्ष काढणे शक्य असते, यावर मॉंटेसोरींचा विश्वास आहे. इथे मात्र, त्या, एक फार महत्त्वाची व्यावहारिक स्वरूपाची सूचना आपल्याला करतात. आपण पाहिलेले, अनुभवलेले बालक हे बऱ्याचदा हट्टी, आपले न ऐकता स्वतःचेच आग्रह पुढे दामटणारे, रडणारे, समजावूनही न राहणारे, शिकण्यात गोडी नसलेले, बेशिस्त, कृतघ्न, किंवा आपणहून म्हणजे सांगितल्याशिवाय चांगले, शिस्तींचें न वागणारे असे असते. ते तसे असेल तर ती, मॉंटेसोरींच्या मते, एक विकृतावस्था आहे. ही विकृतीची अवस्था बालकावर अन्याय्य अशा दडपणांमुळे, शिक्षणाच्या व परिस्थितीच्या ताणांमुळे येत असते. त्यामुळे, बालकाची या विकृतावस्थेतून सोडवणूक

केल्याशिवाय, म्हणजेच समधारण म्हणजे 'नॉर्मल' स्थितीत आणल्याशिवाय त्याचे अवलोकन करणे व त्यातून त्याचे मानस समजावून घेणे, हे शक्य होणार नाही.

माँटेसोरीबाई आपल्या वाङ्मयात अनेकदा, अनेक प्रकारे बालकाच्या स्वातंत्र्याविषयी बोलत असतात. 'स्वातंत्र्य' हे एक अत्यंत महान असे तत्त्व, त्या त्यांच्या शिक्षणपद्धतीला पायाभूत म्हणून मांडतात. या त्यांच्या स्वातंत्र्य संकल्पनेची अनेक परिमाणे दाखविता येतात. बालकाचे अवलोकन करण्यासाठी विकृतीतून सोडवून त्याला समधारण रितीत आणणे, म्हणजे बालकाची विकृतीतून मुक्तता करणे हे त्यांच्या मूलभूत स्वातंत्र्यसंकल्पनेचेच एक परिणाम आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, बालकाचे अवलोकन करून त्याआधारे शिक्षणाच्या शास्त्रीय पद्धती ठरणार असतील तर बालकाचे त्याच्या 'मुक्त' अवस्थेतच अवलोकन करायला हवे. ही 'मुक्त'ता हे बालकाचे एक प्रकारचे स्वातंत्र्य आहे. मानसिक अपंगत्व किंवा मंदबुद्धी अशा बालकांची त्यांच्या विकृतीपासून मुक्तता करून त्यांना समधारण पातळीवर आणून मगच त्यांचे शिक्षण पुढे सरकवता येते, याचा प्रत्यक्ष अनुभव, आपल्या पहिल्या शैक्षणिक प्रयोगांमध्ये, माँटेसोरींनी घेतला होता. याच अनुभवाचे सामान्यीकरण त्या करतात.

असे सर्व दडपणांपासून मुक्त असलेले बालक आपल्या अतःप्रेरणेने वागत असते. आपल्या अंतर्यामी असणारी प्रेरणा ही नैसर्गिक प्रेरणा असते. ही मानवाच्या व्यक्तिगत विकासाची प्रेरणा असते. या प्रेरणेनेच, मूल जन्मल्यापासून आपल्या विकासासाठी सदैव धडपडत असते. या धडपडीतून ते आपल्या स्नायूंना बळकटी आणते, आपल्या ज्ञानेंद्रियांना कार्यरत करते, आपल्या कर्मेंद्रियांना हालचालीतून शक्ती मिळवून देते, आपला शारीरिक विकास पूर्णतेला नेते, आपल्या बौद्धिक - भावनिक क्षमतांची प्रगती साधते. अशाप्रकारे, आपले आपण स्वयंशिक्षण करण्याचीच ही नैसर्गिक प्रेरणा असते.

बालकाला आणखीही एक अद्‌भुत शक्ती निसर्गतः प्राप्त झालेली असते. प्रत्येक बालक जन्माला येते ते त्याच्यापूर्वीच्या अनंत पिढयांनी विकसित केलेल्या संस्कृतीच्या विशिष्ट पातळीवर. याच्या जन्मापूर्वीच त्याला लाभलेले हे एक प्रकारचे संचित असते. प्रत्येक समाजगटाचे सांस्कृतिक संचित, उदाहरणार्थ, भाषा, आचार - विचार, संकल्पना इत्यादी, त्या समाजगटात जन्माला आलेले मूल, आपल्या स्वप्रयत्नाने आत्मसात करीत असते; व पुढे त्याच्याच सहाय्याने आपल्या विकासाचा मागआक्रमत असते. हे कार्य ते समाजातील आपल्या आजूबाजूच्या असलेल्या प्रौढांच्या अनुकरणांतून साधत असते. अर्थात, हे नुसते आंधळे अनुकरण नसते; तर ते प्रत्येक क्रियेमागच्या हेतूंचे समजून घेऊन केलेले अनुकरण असते. अशा अनुकरणातून शैक्षणिक कार्यही घडत असते. मग ते, स्नाय ना सराव देण्यासाठी केलेले पुनरावर्तन असते किंवा बौद्धिक स्तरावरील वस्तू परिचयासाठी केलेले पुनरावर्तन असते.

जन्मल्यापासून, विशेषतः पहिल्या दोन वर्षांत बालक खूप संवेदनशील असते. कारण, त्याची स्वयंशिक्षणाची प्रेरणा खूपच जागृत असते. सतत नवे नवे आत्मसात करण्याचा त्याला ध्यास असतो. आपल्याला जे समजते आहे ते त्याला सांगता येत नसते, तरीपण त्याला ते समजत असते यात शंका नाही. माँटेसोरींनी आपल्या ग्रंथांतून, याची अनेक उदाहरणे दिली आहेत. उदाहरणार्थ, बालकाला 'व्यवस्थे' विषयी, आपल्या अगदी लहान वयात खूप आकर्षण असते. प्रत्येक मूल, आजबाजूच्या वातावरणातील व्यवस्थेविषयी,

वयाच्या दोन वर्षांपर्यंत खूप जागरूक, खूप संवेदनशील असते. जिथल्या वस्तू तिथे असणे हे त्याला भावते. कारण, त्याकरवी त्याला आपल्या आसपासच्या जगाचा परिचय करून घ्यायचा असतो. एखादी वस्तू व तिची विशिष्ट जागा यांचे नाते बालक आपल्या मनात बांधत असते. ते विस्कळित झाले तर बालक संभ्रमित होते, अस्वस्थ होते; वेळप्रसंगी रडूही लागते नि पूर्ववत व्यवस्था लागली तर ते आनंदीही होते.

व्यवस्थेप्रमाणे बालकाला स्वावलंबनाचे वेड असते. यामागेही त्याची नैसर्गिक प्रेरणा व विकासाची गरज असते. बालकाला प्रत्येक गोष्ट स्वत : करून पाहण्याचा छंद असतो. यामध्ये ती गोष्ट येण्यापेक्षा, ती येण्यासाठी करावी लागणारी प्रक्रिया - हालचाल महत्त्वाची असते. बालकाच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक विकासाची ती तयारी असते. आणि म्हणूनच अशा स्वयंविकासाला कारणीभूत ठरणाऱ्या स्वावलंबी कृतींना अडथळा करणा- या प्रौढांच्या सर्व कृती, माँटेसोरी त्याज्य ठरतात. मग घरी पालकांनी, कोणत्याही कारणांनी का असेना, पण बालकांच्या स्वावलंबी कृतींना अडथळा करणे किंवा शाळेत, मुलाला, त्याच्या स्वयंप्रयत्नांना संधी देण्याऐवजी शिक्षिकेने शिकवणे, हे बालकांना त्यांच्या स्वावलंबी कृतीस पारखे करण्यासारखे आणि त्यांच्या नैसर्गिक स्वावलंबी वृत्तीस थोपविण्यासारखे आहे.

त्यामुळे, माँटेसोरी शिक्षणपद्धतीत 'शिक्षिके'चे स्थान बदलते. ती बालकाला विश्वास देणारी, प्रेम देणारी, बालकाच्या स्वयंविकासास अवकाश देणारी, त्याच्या विकासात येणारे अडथळे दूर करणारी, त्याचे मानस समजून घेऊन त्याला त्याच्या नैसर्गिक प्रेरणेने कार्यरत होऊ देणारी अशी त्याची 'सहाय्यक' असते.

माँटेसोरी, म्हणूनच,'बालकाच्या जीवनाच्या विकासाला जे मदतरूप होईल ते शिक्षण,' अशी शिक्षणाची व्याख्या करतात. बालकातूनच संपूर्ण मानव घडत असतो. त्यामुळे, बालक हाच मानव निर्माता अशी भूमिका माँटेसोरी घेताना दिसतात. साहजिकच, समाजाची नीटपणे जडण - घडण होण्यासाठी, त्या, बाल्यावस्थेवर लक्ष केंद्रित करायला सांगतात. एवढेच नव्हे तर, जर अपेक्षित असे कोणतेही बदल समाजात किंवा देशात घडवून आणायचे असतील, देशात परिवर्तन घडवायचे असेल,तर बाल्यावस्थेत असलेली जी नवीन पिढी आहे तिच्यापासून सुरुवात केली पाहिजे, असे त्या सुचवतात. त्यांनी म्हटले आहे, "जर एखादया देशाच्या विशेष पद्धती आणि चालीरीती बदलायच्या असतील अथवा लोकांच्या विशिष्ट गुणधर्मांना चेतना द्यावयाची असेल तर नव्या बाल्यावस्थेतील पिढीलाच केंद्र समजले पाहिजे. प्रौढांचा याबाबतीत उपयोग होऊ शकत नाही.'

यावरून, निष्कर्ष असा निघतो की, समाजात आणि त्याहीपेक्षा एकूणच मानवी संस्कृतीच्या विकासात बालकाचे अनिवार्य असे स्थान आहे. त्यामुळे बालकाच्या शिक्षणाचा विचार हा त्या बालकातून वाढणाऱ्या एका व्यक्तीच्या विकासाशी संबंधित राहत नाही तर संपूर्ण मानवी समाज घडणीशी त्याचा संबंध जोडला जातो.

बालकाविषयी आणि त्याच्या शिक्षणाविषयी ही जी काही वेगळी दृष्टी माँटेसोरींनी एका शतकापूर्वी समाजासमोर ठेवली ती त्या काळाला खरोखरच धक्का देणारी आणि बालकाच्या विकासाविषयी जाणीव करणारी अशी होती.

बालकाच्या विकासाच्या दृष्टिकोणातून आणि मानसशास्त्राच्या आधारे बालकाच्या स्वातंत्र्याचा विचार माँटेसोरींनी आपल्यापुढे ठेवला आहे. विकासक स्वातंत्र्याचा विचार त्यांनी मांडला आहे. बालकाला, व्यक्तिगत

तसेच सामाजिक विकासाच्या मूलभूत प्रेरणा उपजतच प्राप्त झालेल्या असतात. या प्रेरणांना पोषक असे वातावरण म्हणजे म्हणजे मुक्त असे वातावरण, ही प्रत्येक बालकाची प्राथमिक गरजच असते. बालकाच्या निसर्गदत्त प्रेरणा उत्स् फूर्तपणे जागृत होण्यासाठी, माँटेसोरींच्या मते, स्वातंत्र्याचे वातावरण हवे असते. म्हणूनच 'स्वातंत्र्य म्हणजे स्वयंस्फूर्तीचे वातावरण' अशीही स्वातंत्र्याची व्याख्या त्यांच्या वाङ्मयात येते. असे स्वयंस्फूर्तीचे वातावरण बालकांच्या क्रियाशीलतेला चालना देणारे, आव्हान देणारे म्हणून महत्त्वाचे असते.

'बालकाच्या स्वातंत्र्या'ची कल्पना मांडणे ही माँटेसोरीबाईंची जगाला फार मोठी देणगी आहे. बालकाच्या स्वातंत्र्याच्या आवश्यकतेबद्दल त्यांनी अनेक अंगांनी विचार केलेला आहे. तो बालकाच्या वर्गातील शिकण्याचा संदर्भात जसा केला आहे तसाच तो सामूहिक जीवनाच्या संदर्भातही केला आहे. प्रत्येक बालक ही एक स्वतंत्र' व्यक्ती आहे. निसर्गतःच तिचा जन्म, तिचा विकास व तिचामृत्यू या स्वतंत्र गोष्टी आहेत. या अर्थाची छटाही माँटेसोरींच्या वाङ्मयात येते; तद्वतच, व्यक्तीला स्वतःला विकास करवून घ्यायचा असेल तर तो स्वतःच्या कलाने, स्वतःच्या वेगाने करता आला पाहिजे, या अर्थानेही स्वातंत्र्याची संकल्पना येते. बालकाला स्वतःच्या कलाने, वेगाने वाढण्यास वाव दिला पाहिजे. व्यक्तीला, आपल्या विकासासाठी स्वतंत्र वातावरणाची गरज असते, कोणीही कुठल्याही दडपणाखाली, बंधनाखाली. त्या व्यक्तीला ठेवता कामा नये. त्याला स्व - अधीनच राहू दिले पाहिजे; ही भूमिका बालकाच्या वर्गातील शिक्षणालाही तेवढीच लागू पडते. माँटेसोरींचे म्हणणे असे आहे की बालकाला वर्गाचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. बहुधा शाळेतील शिक्षक हेच बालकाच्या भयाचे प्रमुख कारण असते. शिक्षकाची उग्र करडी नजर, हातातील काठी, शाळेतील शिस्तीचा बडगा, धाक, शिक्षा आणि परीक्षासुद्धा शालेय वातावरण भयग्रस्त करून सोडतात, हा आपला अनुभव आहे. शिक्षककेंद्री शिक्षणातून आलेल्या या सर्व बाबी बालकाला कायम भयग्रस्त व दडपणाखाली ठेवत असतात. यातूनच बालकाचे स्वातंत्र्य हिरावले जाते, बालकाची स्वयंस्फूर्ती आक्रसते, बालकाच्या स्वावलंबी क्रियाशीलतेला सोडचिठ्ठी दिली जाते आणि मग बालकाची विकासाची निसर्गदत्त प्रेरणाच दूषित होते. हे सारे वातावरण म्हणजे एकप्रकारे बालकासाठी गुलामीचे वातावरण असते. बालकाच्या स्वयंशिक्षणाला नि स्वयंविकासाला असे वातावरण मारक असते. किंबहुना यामुळेच, वर्गातील शिक्षक हा वेगळे वातावरण निर्माण करणारा, विश्वासाचे, प्रेमाचे, मुक्ततेचे वातावरण निर्माण करणारा असावा अशी, शिक्षकाकडून या नवशिक्षणपद्धतीत अपेक्षा केली जाते.

वर्गातील शिक्षकाच्या शिकविण्याला एक वेगळा प्रभावी पर्याय माँटेसोरी पद्धतीत निर्माण झाला आहे. तो म्हणजे, वेगवेगळया प्रकारच्या नि बालकाला सर्वांगीण विकासाच्या दिशेने नेणाऱ्या शैक्षणिक साधनांचा पर्याय . माँटेसोरी पद्धतीचे खास वैशिष्ट म्हणजे ही साधने. यात जीवन व्यवहाराची साधने येतात. तशीच हस्तव्यवयास, बागकाम, प्राणिसंगोपन, स्वाध्याय उपक्रम, सामाजिक शिक्षण असे भिन्न भिन्न मनोरंजक उपक्रमही येतात. या साधनांमुळे व उपक्रमांमुळे शिक्षण हे बालकाच्या 'स्वाधीन' राहते व त्याकरवी बालकाची स्वातंत्र्याची वृत्ती जोपासली जाते; क्रमशः विकसीत होत जाते.

माँटेसोरींच्या स्वातंत्र्य संकल्पनेचे एक वैशिष्ट्य असे की ते केवळ व्यक्तिस्वातंत्र्यापुरते मर्यादित नाही. व्यक्तीला समाजातच जगायचे असते, वाढायचे असते, विकसित व्हायचे असते. त्यासाठी बालपणापासून तिला सामाजिक जीवनातील रीतीभाती कळणे, योग्य सवयी लागणे आवश्यक आहे. सामूहिक जीवनाची सवय

लहानपणापासूनच लागू शकते. त्यासाठी बालशाळेतही सामूहिक उपयोगाची साधने व उपक्रम यांना स्थान दिले जाते. बालक स्वतंत्रतेने आपला विकास साधत असेल तरीही त्याला त्याचवेळी सामूहिक जीवनाची सवय ही लावून घ्यावी लागते. त्यामुळे सामाजिक जीवनाचा स्वीकार हाही व्यक्तिस्वातंत्र्याचेच एक परिणाम म्हणून येथे येतो. स्वातंत्र्याच्या मूल्याला येथे सहकाराच्या मूल्याची जोड दिली जाते. संपन्न आयुष्याची निर्मितीसाठी, स्वातंत्र्याच्या जोडीने सहकारही आवश्यक असतो.

बालकाला निसर्गाने उपजतच स्वयंप्रेरणा दिली आहे. ही प्रेरणाच त्याला सतत क्रियाशील ठेवीत असते. या क्रियाशीलतेनेच बालक समृद्ध अनुभवांची प्राप्ती करत असते. आणि ही अनुभव समृद्धताच बालकाचे पूर्ण मनुष्यात रूपांतर करीत असते. याचा अर्थ असा की अशी पूर्णता येण्यासाठी बालकाला आपल्या विकासाचे आंतरिक नियम पाळावे लागतात. याची अनेक उदाहरणे माँटेसोरींनी दिली आहेत. उदाहरणार्थ, शरीरात असंख्य स्नायू असतात. बालकाला आपल्या पूर्णत्वाकडे जाण्याच्या प्रवासात प्रत्येक स्नायू बळकट बनवावा लागतो. क्रियाशील बनवावा लागतो. एवढेच नव्हे तर,माणसाच्या कित्येक क्रियांसाठी एकाच वेळी अनेक स्नायूंना एकत्र येऊन काम करावे लागते. अतिशय गुंतागुंतीच्या या प्रक्रियेत सर्वच स्नायूंना समजूतदारपणे, इतर स्नायूंशी सहकार करावा लागतो. ही परस्परसहकाराची ऊर्मीही निसर्गानेच बहाल केलेली असते. बालकाने स्वतःचाच स्वतःशी केलेला हा सहकार असतो. मानवाच्या व्यक्तिगत व सामूहिक विकासाच्या अंतर्यामी अशाप्रकारे निसर्गाचीच जबरदस्त प्रेरणा असते, आणि ती विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करीत असते, असे जेव्हा माँटेसोरी म्हणतात तेव्हा त्या, निसर्गाच्या याच अद्भूत शक्तीकडे अंगुलीनिर्देश करीत असतात.

अशाप्रकारे, कितीतरी अंगांनी आणि शास्त्राधार घेऊन माँटेसोरींनी बालकाच्या स्वातंत्र्याची गीता सांगितली आहे. शिक्षणशास्त्र नव्याने मांडताना त्याचा मूलाधार म्हणून ही स्वातंत्र्याची संकल्पना येते. बालकाच्या मनाला रचनात्मक वळण लावणारी स्वयंशिक्षणाला पोषक म्हणून ती संकल्पना येते. तसेच सामाजिक नियमांच्या स्वीकृतीचे वळण लावण्यास सहाय्यभूत होणारी म्हणूनही ही स्वातंत्र्याची संकल्पना येते. एका अर्थाने बालकाला ' नागरिकत्वाचे भान ' आपल्या स्वयंपेरणेने प्राप्त करून देण्याचा खराखुरा मार्ग, एकमेव मार्ग म्हणजे त्याला त्याचे स्वातंत्र्य बहाल करणे, हाच होऊ शकतो. अशाप्रकारे येणारे नागरिकत्वाचे भान हे कुणाच्या तरी सांगण्याने, शिकविण्याने आलेले नसते, शिक्षेच्या भीतीपोटी आलेले नसते,धार्मिकतेच्या दडपणाने आलेले नसते अथवा राजकीय अपरिहार्यतेने आलेले नसते.

हे नागरिकत्वाचे भान केवळ आपल्याला प्राप्त झालेल्या स्वातंत्र्यापोटी जागृत झालेल्या आपल्या विवेकातून आलेले असते. ते खरेखुरे बुद्धिनिष्ठ भान असते.

असे विवेकनिष्ठ, बुद्धिनिष्ठ भान हाच मानवाच्या नागरी जीवनाचा मूलाधार आहे. माँटेसोरींच्या बालकाच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेची ही परिणती आपण जाणीवपूर्वक आपलीशी केली पाहिजे.

❖